Annexure XXI(5),(Vide Article-21.05.04)

विषय:- इमारतीचे परिरक्षण व दुरुस्ती

क्रमांक कक्ष-२४/ [३]/३५/परि/९४२सन १९९०-९१.

नागपूर-४४० ००१, दिनांक ८ फेब्रुवारी, ९१

" प रि प त्र क "

सध्या वन विभागाच्या ताब्यात अनेक इमारती आहेत. यात प्रशासकी इमारती व निवासस्थानीय इमारतींचा समावेश आहे. यातील ब-याचशा इमारती पक्क्या असून पूर्वीच्या जुन्या काही इमारती निम पक्क्या आहेत. या स इमारतीचे परिरक्षण व चालू दुरुस्ती करण्याची जबाबदारी वन विभागाव आहे. पण असे आढळून आले आहे की, काही इमारतीकडे अंशात: अगर संपुर्णपणे दुलक्ष होते. त्यामुळे या इमारतींवर पावसाळ्यापूर्वी अगर पावसाळ्यानंतर वेळीच दुरुस्ती न केल्यामुळे विपरीत परिणाम होतो व नाइलाजाने जादा खर्च करुन विशेष दुरुस्तीचे काम हाती घ्यावे लागते किंवा प्रसंगी संपूर्ण इमारतीचे नुतनीकरण करावे लागते. सारांशाने म्हणावयाचे झाल्यास एकूण एक इमारतीची देखभाल समाधानकारक पणे होत नाही. आता नवीन बांधकामासाठी पूर्वी पेक्षा अनेक पटीने खर्च वाढल्याने सध्याच्या इमारती सुरक्षित ठेवणे अत्यावश्यक आहे.

२. शासनाने परिरक्षण व चालू दुरुस्ती वेळेवर करुन सर्व इमारती सुस्थीतीत व वापरण्यायोग्य ठेवण्यासाठी सूचना दिलेल्या आहेत. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाचे परिपत्रक क्र. बी.डी.जी. ११८०/३८ डी-२ दिनांक २९ जूलै, १९८० अन्वये यासाठी मापदंड निश्चित केलेले आहेत. त्याची प्रत सोबत जोडली आहे. याप्रमाणे प्रशासकीय व निवासस्थानिय इमारतीच्या चालू दुरुस्ती व परिरक्षणाकरीता रुपये १०/- प्रति चौरस मि व विद्युतीकरणाच्या दुरुस्तीसाठी रुपये १.५० प्रति चौ. मिटर असे एकूण रुपये ११.५० प्रति चौरस मिटर या दराने प्रत्येक इमारतीसाठी रक्कमेची मर्यादा घातली आहे. जर इमारती २५ वर्षापेक्षा जुन्या असतील तर या रकमेत २५ टक्के वाढ सुचविलेली आहे. स्थानिक कर, सेवा शुल्क इत्यादिंचा यात समावेश नाही. तेव्हा कोणत्याही इमारतीच्या परिरक्षण व चालू दुरुस्तीवर या मर्यादेपेक्षा जास्त खर्च प्रतिवर्षी होणार नाही याची दक्षता घ्यावी.

3] दर वर्षी प्रत्येक वन वृत्तातून येणा-या मागणी नुरुप व उपलब्धाता प परिरक्षणाकरीता अनुदान मंजूर करण्यात येते. या मंजूर अनुदानातून प्रकर्षाने आवश्यक असलेली चालू दुरुस्तीची कामे हाती घेण्यात यावीत. विशेषात: वनरक्षक व वनपाल यांची निवासस्थाने सुस्थितीत राहण्याची काळजी घ्याव अधिकारी वर्गाच्या निवास स्थानावरच मंजूर अनुदान मोठ्या प्रमाणात खर्च करु नये. तसेच अधिका-याच्या बदलीनंतर बंगल्याचा डिसटेंपर/ ऑईलपेंट बदललाच पाहिजे ही पडत चाललेली प्रथा योग्य नाही. उपवनसंरक्षकानी या ऐवजी खालच्या श्रेणीतील निवासस्थानाच्या देखभालीकडे जास्त लक्ष दिले पाहिजे.

-२-

या अनुदानातून जरुर पडल्यास जुन्या काही इमारतींच्या विशेष दुरुस्तीचीही कामे घेण्यास हरकत नाही. पण त्या अगोदर सविस्तर नकाशे अंदाजपत्रके तयार करावयास हवीत. इमारती सुस्थितीत ठेवण्यासाठी ठराविक कोणत्या बाबी आवश्यक आहेत याची यादी वन अभियंता, नागपूर यांनी तयार केली असून ती सोबत माहिती व जरुर त्या कार्यवाहीसाठी जोडलेली. या यादी मध्ये रंगसफेदी अगर ऑईल पेन्ट इत्यादी करण्यासाठी सर्व साधारण काल मर्यादा दर्शविलेली आहे. मंजूर अनुदानातून एका वर्षी निवास स्थान डिस्टेंपर चे काम आणि त्यानंतर पुढील वर्षी ऑईल पेन्टचे अगर इतर काम केल्यास मंजूर अनुदानातून सर्व इमारतींची देखभाल करणे शक्य आहे.

यासाठी विभागातील सर्व इमारतीचे परिरक्षण ३ वर्षाचे कालावधीत पूर्ण होईल हे ध्यानात घेवून अवस्थाबद्ध कार्यक्रम उप वनसंरक्षकांनी तयार करावा व त्यास वन संरक्षकानी मान्यता द्यावी. अशी मान्यता दिल्यानंतर वृत्तातील एकूण एक इमारतीचे उपलब्ध अनुदानातून परिरक्षण केले जाईल व अवस्थाबद्ध कार्यक्रमाची अंमलबजावणी होईल याची खबरदारी सर्व वनसंरक्षकानी घ्यावी. चवथ्या वर्षापासून पुन्हा हाच कार्यक्रम चक्राप्रमाणे अंमलात आणता येईल.

(सही)
मुख्य वनसंरक्षक,
वन्यप्राणी,
महाराष्ट्र राज्य,
नागपूर.

प्रतिलिपी प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर
-"- मुख्य वनसंरक्षक [संधारण] महाराष्ट्र राज्य, नागपूर
-"- मुख्य वनसंरक्षक [उत्पादन] महाराष्ट्र राज्य, नागपूर
-"- मुख्य वनसंरक्षक [ मुल्यांकन व राष्ट्रीयीकरण] महाराष्ट्र राज्य, नागपूर
-"- कक्षा-१, कक्षा-२, कक्षा-४, कक्षा-५ कक्षा-६,
-"- वनसंरक्षक ---------------- वृत्त ------------
-"- उप वनसंरक्षक ------------ विभाग ------------
-"- वनअभियंता, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
-"- उप वनअभियंता ------------ वृत्त ------------